# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**संदर्भ -** विद्यापीठ कार्यालयाकडून वेळोवेळी पाठविण्यात येणारी परिपत्रके / पत्रे.

महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, विविध शिखर संस्था, विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेले निर्णय व अन्य स्त्रोतांकडून प्राप्त झालेली परिपत्रके/पत्रे इ. माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांना वेळोवेळी पाठविण्यात येतात. याकरीता विद्यापीठामार्फत सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना ई-मेलआयडी पुरविण्यात आले आहेत. यानुसार या ई-मेल आयडीवरच सदरची परिपत्रके / पत्रे आता ई-मेलद्वारे पाठविण्यात येतात. त्यामुळे महाविद्यालयांना वेळेत परिपत्रके / पत्रे प्राप्त होणे तसेच त्याअनुषंगाने महाविद्यालयांनाही तात्काळ उत्तर पाठविणे सोयीचे झाले आहे.

ब-याच वेळा त्याअनुषंगाने संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांकडून माहिती संकलीत करून शासन अथवा तत्सम ठिकाणी पाठवावी लागते. तथापि, सदरची परिपत्रके / पत्रे पाठविल्यानंतर ब-याच महाविद्यालयांकडून विहित कालावधीमध्ये माहिती प्राप्त होत नाही. सदरबाबत स्मरणपत्रे पाठवूनही अपेक्षीत माहिती विद्यापीठ कार्यालयास प्राप्त होत नाही.

याअनुषंगाने सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांना कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांना यापुढे विद्यापीठाने पुरविलेल्या ई-मेलआयडीवरच **ई-मेलद्वारेच** परिपत्रके / पत्रे पाठविण्यात येणार असल्याने महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी ऑन लाईन असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी दररोज विद्यापीठाची वेबसाईट आणि संबंधीत ई-मेलचा Inbox पाहून कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर परिपत्रके / पत्रांच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यालयास माहिती पाठवावयाची असेल तर सदरची माहिती विहित नमुन्यात व विहित कालावधीमध्येच विद्यापीठ कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. यापुढे संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी सदरची माहिती विहीत कालावधीमध्ये पाठविली नाही तर **गंभीर** दखल घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/ 132

दि. 26 SEP 2016

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.